जा/क्र./रचनाशारीर 18/2026
दि. 13/02/2026

प्रती,

मा.अधिष्ठाता
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय
जळगाव

विषय :- रचना शारीर विभागातर्फे दि. 11/02/2026 रोजी घेतलेल्या "Personality Development and Quality Improvement Program" या विषयावर प्रोत्साहनपर व्याख्यान कार्यक्रमाचा अहवाल सादर करण्याबाबत.

मा. महोदय

उपरोक्त विषयान्वये दि. 11/02/2026 रोजी रचना शारीर विभागातर्फे "Personality Development and Quality Improvement Program" या विषयावर मा. मो. एजाज शेख सर यांचे प्रोत्साहनपर व्याख्यानाचे आयोजन केले होते, या कार्यक्रमाचा सम्पुर्ण अहवाल आपल्या माहितीस्तव सादर करीत आहे.

आदरणीय डॉ. गंगासागरे सर मा. अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगाव यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आज सकाळी 11 ते दुपारी 1 वा. च्या दरम्यान अतिथी व्याख्याता म्हणून लाभलेले मा. मो. एजाज शेख सर, Life Coach and Trainer यांचे "Personality Development and Quality Improvement Program" या विषयावर प्रोत्साहनपर व्याख्यान बीएएमएस सर्व वर्ष विद्यार्थ्यांकरिता आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी मा. मो. एजाज शेख सर यांच्या तर्फे अतिशय उत्कृष्ट असे प्रोत्साहनपर व्याख्यान देण्यात आले. त्यांच्या व्याख्यानाचा सर्व विद्यार्थ्यांनी खूप लाभ घेतला. व्याख्यानाच्या वेळी मा. अधिष्ठाता महोदय डॉ. गंगासागरे सर यांनी आपल्या व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी सर्वप्रथम सर्व विद्यार्थ्यांसह अन्य उपस्थित अध्यापकांना, कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देऊन अतिशय प्रेरणादायी महापुरुषांच्या जीवनाचा, विचारांचा आदर्श घेण्यासाठी काही प्रसंग सांगितले. स्वतःच्या जीवनातील आई-वडिलांचे महत्त्व सांगितले.

मा. मो. एजाज शेख सर यांनी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचे तीन गुण सांगून यावर भाष्य केले. जगभरासह जळगाव येथील अन्य प्रतिष्ठित Life Coach and Trainer तज्ञांची कीर्ती याबद्दल सर्व विद्यार्थ्यांना अवगत करून Personality Development and Quality Improvement पद्धती अंगीकारावी याबद्दल मार्गदर्शन केले आणि यामुळे सर्व विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली.

यावेळी कायचिकित्सा विभागाच्या विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ. सूर्यवंशी मॅडम, रोग निदान विभागाचे विभाग प्रमुख डॉ. कांबळे सर, स्वास्थ्य वृत्त विभागाच्या विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ. विद्या वासनिक मॅडम, शरीर क्रिया विभागाचे विभाग प्रमुख डॉ. राजपूत सर, स्त्रीरोग प्रसूति तंत्र विभागातील सहयोगी प्राध्यापिका डॉ. बळी मॅडम, सहाय्यक प्राध्यापिका डॉ. फराटे मॅडम, कायचिकित्सा विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. नेहते मॅडम आणि अन्य प्राध्यापक वर्ग व अन्य कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी प्रथम वर्ष विद्यार्थिनी झेबा हिने सर्व उपस्थित अधिष्ठाता महोदय, विभाग प्रमुख, प्राध्यापक वर्ग, कर्मचारी, आणि विद्यार्थ्यांसह सर्वांचे खूप खूप आभार मानले. ह्या व्याख्यान कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता सर्व प्रथम वर्ष विद्यार्थ्यांच्या सहभागासह शरीर रचना विभागाचे डॉ. सचिन नरवाडे आणि विभागातील सर्व कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला.

सोबत कार्यक्रमाचे छायाचित्र जोडत आहे.

विभाग प्रमुख
रचना शारीर विभाग

जा/क्र./रचनाशारीर 18/2026










शासकीय आयुर्वेद महाविद्यालय जळगाव
युगे अठ्ठावीस विटेवरी उभा
GPS Map Camera
Jalgaon, Maharashtra, India
Gate No 56 Shirsoli Road Tambapura Post Box, No. 113, M.s, Jalgaon, Maharashtra 425003, India
Lat 20.961967° Long 75.551048°
Wednesday, 11/02/2026 11:57 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Jalgaon, Maharashtra, India
Gate No 56 Shirsoli Road Tambapura Post Box, No. 113, M.s, Jalgaon, Maharashtra 425003, India
Lat 20.961981° Long 75.551054°
Wednesday, 11/02/2026 11:53 AM GMT +05:30
Google


शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय जळगाव
Government Ayurved College And Hospital Jalgaon
Topic-
Personality Development
& Self Assessment
Speaker- Aejaz M. Shaikh
Date:-11/02/2026
Dr Nagnath Gangasagre sir
Dean
विटेवरी उभा
GOVERNMENT AYURVED COLLEGE JALGAON
GPS Map Camera